# क्विक हिलतर्फे आरएसएस जनकल्याण समितीला रुग्णवाहिका

▮ **मुंबई** : भारतातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा वाढवण्याच्या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून क्लिक हिल फाऊंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने पनवेल येथील आरएसएस जनकल्याण समितीसाठी त्यांच्या आरोग्य यान उपक्रमांतर्गत, क्विक हिलने रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना चांगल्या आरोग्य सेवापुरवण्याकरता अगदी नवी अॅम्ब्युलन्स दान केली.



क्विक हिल टेक्नोलॉजीजचे एमडी आणि सीईओ कैलाश काटकर, क्विक हिलच्या सीएसआर अॅक्टिव्हिटी आणि आरोग्य यानामागील प्रणेत्या अनुपमा काटकर आणि विठ्ठल डाके (डेप्यु. कमिशनर पनवेल पीएमसी), धैर्यशील जाधव (असिस्टंट कमिशनर पनवेल पीएमसी), आरएसएस जनकल्याण समिती, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर आणि उपाध्यक्ष विनायक दंभीर यांच्या उपस्थितीत या दानाचा कार्यक्रम पार पडला. क्विक हिलचे अत्याधुनिक आरोग्य यान रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांना सेवा देईल. अतिदुर्गम भागातील डॉक्टर आणि रुग्णांना प्रवासाकरता ही उपयुक्त ठरेल. तसेच रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना नियमित तपासणी, निदान आणि उपचार यांसारख्या आरोग्य सेवा पुरवल्या जातील. याप्रसंगी क्विक हिल टेक्नोलॉजी लिमिटेडचे एमडी आणि सीईओ डॉ. कैलाश काटकर म्हणाले, क्विक हिल टेक्नोलॉजीमध्ये आम्ही अनेक समाजोपयोगी उपक्रमांद्वारे सामाजिक उत्तरदायित्व बजावतो. उदा. रायगड जिल्ह्यातील वंचित लोकांची वृद्धी आणि विकासाकरता आरएसएस जनकल्याण समितीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.